पुणे महानगरपालिका

# जाहीर प्रकटन

शहर अभियंता कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.शअजा/-श.अ.जा/ ६८७
दिनांक - ३२/७/२०२१

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जुन्या घरांना पावसाळ्यात धोका निर्माण होतो, अशा धोक्याच्या घरांपासून राहणाऱ्या नागरिकांना व त्या घराच्या आसपास तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या जिवितास धोका नाहीसा करण्याबाबत आवश्यक ती सर्व दक्षता घेणे गरजेचे आहे.

महानगरपालिकेच्या वतीने धोकादायक व राहण्यास अयोग्य असे नमूद केलेल्या जुन्या घरांमधील मालक/भाडेकरू/रहिवाशी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६८ (बी) व (सी) अन्वये राहती जागा धोका टळेपर्यंत त्वरीत खाली करणेच्या नोटीसा बजाविणेत आल्या आहेत. अशा नागरिकांनी सदर घरे त्वरीत खाली करणे आवश्यक आहे. सदर इमारतीतील भाडेकरू/ सदनिकाधारक व मालक/सहकारी संस्था यांना त्यांचे ताब्यातील क्षेत्राप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**जे नागरिक अशा धोक्याच्या नोटीसा दिलेल्या किंवा धोकादायक घरात राहत असतील तर ते नागरिक व्यक्तीशः स्वतःच्या जबाबदारीवर राहत आहे. या धोकादायक घरात राहत असताना जर काही अपघात झाल्यास पुणे म.न.पा. त्या अपघातास जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.**

शहरातील एखादी इमारत अथवा तिचा काही भाग आकस्मितरित्या कोसळल्यास त्याची माहिती पुणे महानगरपालिकेस दुरध्वनी क्र. ०२०-२५५०१००० तसेच कसबा पेठ फायर बिग्रेड दुरध्वनी क्र. ०२०-२४५७८९५० व सेंट्रल फायर बिग्रेड, भवानी पेठ दुरध्वनी क्र. ०२०-२६४५१७०७ तसेच १०१ वर तात्काळ मदतीसाठी संपर्क साधावा. तसेच अधिक तपशीलसाठी http://www.pmc.gov.in-Discloser” या संकेतस्थळावर मुख्य पृष्ठावर माहिती उपलब्ध आहे.

पावसाळा सुरू होत असल्याने नागरीकांच्या जिवितास होणारा धोका व संभाव्य जिवित, वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेस जरूर ते सहकार्य करावे, अशी विनंती आहे.

शहर अभियंता
पुणे महानगरपालिका

D:\Aarti26\PMC Dept\Jahir Prakatan 2021.docx

Scanned by CamScanner

City Engineer Department
Pune Municipal Corporation
Outward No.- C.E. / 681
Date : - 12/4/2021

**Pune Municipal Corporation**

## Public Disclosure

During rainy season, there is possibility of imminent danger to old structures in Pune Municipal Corporation area. Also there is possibility of life threatening to citizens staying in such structures. To avoid such dangerous situation all vigilant owner / developers / concerned residences are needed to inspect such old structures.

Pune Municipal Corporation has already issue notices under Maharashtra Municipal Corporation Act 268(B) & (C) to vacate such premises till the danger to such structure is avoided.

It is hereby again informed that all this citizens who are staying in such dangerous structures shall themselves be responsible and in no case for any accidents Pune Municipal Corporation shall be held responsible.

In case any such building or part of suddenly collapses, then information in this regards has to be immediately informed to Pune Municipal Corporation Contact No. 020-25501000, Kasaba Peth, Fire Brigade dept. Contact No. 020-24578950, Bhavani Peth, Fire Brigade dept. Contact No. 020-2641707 and also on 101 for immediate help. Also additional information is available on Pune Municipal Corporation website http://www.pmc.gov.in-Discloser"

Considering the arrival of monsoon season citizens staying in Pune Municipal Corporation area are hereby requested to co-operate with Pune Municipal Corporation to avoid the possible living or structural calamity if any.

**City Engineer**
**Pune Municipal Corporation**



Scanned by CamScanner